## माझा अनिरुद्ध प्रेमळा

*– कौमुदिनीवीरा विचारे, कंबोडिया*

---

'तुम्ही त्यांना सांगा अथवा नका सांगू, पण प्रत्येक श्रध्दावानाचा सर्वस्वी भार उचलून बापू सर्वांना मदत करतच असतात' हे ह्या श्रद्धावान स्त्रीचे तिच्याच अनुभव कथनातील बोल, हा अनुभव वाचल्यावर मनापासून पटतात.

---

हरि ॐ. मी मुंबईत परळला राहायला असताना सन् १९८७ पासून डॉ.अनिरुध्द जोशींकडे एक पेशंट म्हणून जायचे. मी एम.आर. (मेडिकल रिप्रेझेंटेटीव्ह) झाले आणि मग कामाच्या निमित्तानेही माझे डॉक्टरांकडे जाणे व्हायला लागले. १९९६ पासून सद्गुरुतत्वाची खरी ओळख पटल्यावर, मी डॉक्टरांकडे, सद्गुरु अनिरुध्द बापू म्हणून जायला लागले. काही वर्षांनी आमचे कुटुंब कंबोडियाला शिफ्ट झाले.

माझा हा अनुभव १९९४चा आहे. गुरुचरित्रातील १४वा अध्याय बापूंनी कसा काय माझ्याकडून अगोदरच वाचून घेतला, हे मला इथे सांगायचे आहे. परळला राहायला असतानाच सन् १९९४ साली सप्टेंबर किंवा ऑक्टोबरमध्ये मी अनपेक्षितपणे आईच्या घरी गेले होते. माझ्या बाबांचे एक मित्र आहेत, जे गावाला राहतात. ते आईच्या घरी अगदी पहिल्यांदाच आले होते. त्यांची व माझी आईकडेच भेट झाली. मी तेव्हा गरोदर होते. बाबांच्या मित्राने मला विचारले, ''बेटा तू गरोदर आहेस ना? मग आजपासून गुरुचरित्राचा १४वा अध्याय वाचण्यास सुरुवात कर''. माझे बाबाही दत्तात्रेयांचे भक्त आहेत. त्यामुळे मलाही गुरुचरित्राची माहिती होती व मी १४व्या अध्यायाची लहानशी पुस्तिका विकत आणली. ती पुस्तिका वाचायला मी सुरुवात केली.

२७ मार्च १९९५ पर्यंत मी दररोज १४वा अध्यायाचे पठण करत होते. त्यानंतर मला प्रसूती वेदना सुरु झाल्या. आम्ही लगेच रुग्णालयात गेलो आणि सकाळी ६ ते ६।। च्या दरम्यान मला लेबर वॉर्डमध्ये नेण्यात आले. मला आंतरिक रक्तस्त्राव व्हायला सुरुवात झालेली होती. बाळाला इन्फेक्शन व्हायची दाट शक्यताही डॉक्टरांनी दर्शवली होती. सकाळी ११ वाजता मला मुलगा झाला. बाळाला अधिक इन्फेक्शन न होवो म्हणून डॉक्टरांनी त्याला जेन्टामायसीनचे इंजेक्शन दिले. बाळ झाल्यावर माझा प्लासन्टा बाहेर न येता, आतच त्याचे तुकडे झालेले होते. डॉक्टरांना नुसते प्लासन्टाचे तुकडे बाहेर काढायचे नव्हते, तर रक्तस्त्रावही थांबवायचा होता. डॉक्टरांसाठी ही आव्हानात्मक बाब होती. मला अचानक इतके सामर्थ्य प्राप्त झाले की मी देवाला म्हणाले, ''देवा जशी तुझी इच्छा असेल तसे होऊ दे''. ही प्रार्थना केल्यावर हळूहळू सगळं काही व्यवस्थित व्हायला लागलं. मला होणारा रक्तस्त्राव कमी झाला व रात्री ९।। पर्यंत मला जनरल वॉर्डमध्ये आणले. माझे बाळ तर खूपच सुदृढ होते.

पुढे काही वर्षे मी संसार व बाळाला सांभाळून बापूंच्या प्रवचनाला जायला लागले. एकदा बापूंच्या प्रवचनाला गेले असता नेमके त्याच वेळी बापूंनी गुरुचरित्रातील १४व्या अध्यायावर बोलायला सुरुवात केली. तेव्हा माझ्या लक्षात आले की ह्या सद्गुरुतत्वाला माझ्यावर येणाऱ्या संकटाची अगोदरच कल्पना होती. त्यामुळे हे संकट यायच्या काही महिन्यांपूर्वीच त्यांनी माझ्यासाठी पूर्वतयारी केलेली होती. माझ्या आईच्या घरी पहिल्यांदाच येणाऱ्या बाबांच्या 'त्या' मित्राच्या रूपात येऊन बापूंनी मला गरोदरपणात १४वा अध्याय वाचायला सांगितला आणि माझे बाळ व मी त्या कठीण प्रसंगातून सुखरूप बचावलो. माझा विश्वास आहे

की कुठेही, कधीही व कुठल्याही क्षणाला बापू माझ्या बरोबर असतातच.

सन् २००७ मध्ये आम्ही कंबोडियाला गेलो. बापूंनी आम्हाला दिलेला २००८ मधील एक अनुभव मी आता सांगणार आहे. दोन दिवसांनी सुट्टी असल्याने कंबोडियातील मित्र परिवारांसोबत आम्ही सहलीला जायचे ठरवले. आमच्या बरोबर एकूण तीन कुटुंबे होती. एका गाडीत आम्ही व आमच्या सोबत एक बापूभक्त कुटुंब होते. आम्ही फक्त ७ कि.मी. अंतरावर गेलो आणि अचानक माझ्या पतीच्या मोबाईलवर कंबोडिया उपासना केंद्रातील एका श्रध्दावानाचा एक संदेश आला. त्यांनी ''हनुमान चलिसेचे पठण करण्यास सुरुवात करा'', असे सर्वांना सांगितले. आम्ही लगेचच हनुमान चलिसा म्हणायला सुरुवात केली. हे पठण करत करतच आम्ही एका रिसोर्टला पोहोचलो. तिथे खूप धमाल केली आणि दुसऱ्या दिवशी संध्याकाळी परतीच्या प्रवासास निघालो.

घरी परतल्यावर आमची गाडी मी सर्विसिंगला टाकली. मला गॅरेजच्या मेकॅनिकने विचारले, ''तुम्ही गाडी घेऊन कुठे गेला होता? तुमच्या गाडीचे पाठीमागचे दोन्ही ब्रेक फेल झा-लेले आहेत''. हे ऐकताच माझी पायाखालची जमीनच सरकली. आमच्यावर इतके मोठे संकट येणार आहे, ह्याची साधी चाहूलही बापूमाऊलीने आम्हाला लागू दिली नव्हती. ह्या उलट एका संदेशाद्वारे आम्हा सर्वांकडून हनुमान चलिसेचे पठण करवून घेतले. ह्या पठणामुळे आमच्या गाडी भोवती एक सुरक्षा कवच निर्माण झाले असा माझा विश्वास आहे. ह्यामुळेच इतके मोठे संकट आम्हाला स्पर्शही करू शकले नाही. श्रद्धावानांच्या बाबतीत संकटे येतात आणि त्यातून काहीतरी मार्ग हा निघतोच. इथे तर बापूंनी आमच्यापर्यंत हे अरिष्ट येऊच दिले नाही. आम्ही मजेत आनंदात नामस्मरण करत प्रवास करत होतो. असे अनेक अनुभव आम्हा प्रत्येक श्रध्दावानाला येतच असतात.

एकदा ३१ जुलै २०१५ला मी मुंबईत असताना, गोरेगावहून घरी जात होते. लोकल गाडीने प्रवास करायची मला सवय नव्हती. मी समोर दिसेल त्या ट्रेनमध्ये, इंडिकेटर न बघताच चढले. स्टेशन आल्यावर मी खाली उतरले आणि खूप ऊन असल्याने बॅगेत असलेली छत्री उघडायला गेले. बघते तर काय! मी माझी बॅगच त्या लोकल गाडीत विसरले होते. माझी बॅग मला कशी मिळेल ही काळजी मला वाटायला लागली. मला असे वाटत होते की आपण केलेल्या चुकीसाठी बापूंना त्रास देणे योग्य नाही. बापूंना मनातून काहीही सांगायचे नाही असे मी ठरवले.

मी स्टेशन मास्टरला सांगितले आणि तिथून निघाले. मी कुठली ट्रेन पकडली होती हे ही मला माहित नव्हते. माझ्या तिकिटावर ११.४२ अशी वेळा लिहिलेली होती. त्या अंदाजाने स्टेशन मास्तरने चर्चगेटला फोन केला. ते म्हणाले, ''अमुक अमुक ट्रेनमध्ये स्त्रियांच्या डब्यात लाल रंगाची बॅग राहिली आहे का ती बघून सांगा''. त्यांनी माझे नावही सांगितले. त्या दिवशी गुरुपौर्णिमा असल्याने देवळात जाऊन मग घरी जायचा निर्णय मी घेतला. बापूंना काहीही झाले तरी त्रास द्यायचा नाही असा मी मनातून ठाम निश्चयच केलेला होता. मी माझ्या घराजवळ आले आणि मला बॅग मिळाल्याचा फोन आला. त्या स्टेशन मास्तरने माझी बॅग एल्फिस्टन रोड स्टेशनला मागवली होती. खरं तर चर्चगेटला माझी बॅग मिळाली होती. मग स्वाभाविकपणे मलाच चर्चगेटला जाऊन ती बॅग माझ्या ताब्यात घेणे भाग होते. मी बापूंना हाक न मारताही बापूंनी ती बॅग मला काहीही त्रास न

होऊ देता एल्फिस्टनलाच आणून दिली. मी बापूंना त्रास द्यायचा नाही असे ठरवले खरे, पण बापूंनीच मला मदत केलेली होती.

बापूंना त्यांच्या बाळांची प्रत्येक क्षणाला किती काळजी असते हे माझ्या लक्षात आले. बापू आपल्या बरोबर नेहमीच असतात. तुम्ही त्यांना सांगा अथवा नका सांगू, पण प्रत्येक श्रध्दावानाचा सर्वस्वी भार उचलून बापू सर्वांना मदत करतच असतात.

हरि ॐ श्रीराम अंबज्ञ

नाथसंविध्